# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक २९.०६.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २८.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०८ केसेसमध्ये ०८ ईसमांवर कारवाई करून ८,८४०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये १ केसमध्ये ०६ इसमांवर कारवाई करुन ६,४५०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,४२० वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,२६,४३३/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पोलीसांची कामगिरी :— अंमली पदार्थ विषयी खोटया गुन्हयात अडकविण्याचा प्रयत्न करणाऱ्या व एमडी पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

नागपूर शहर पोलीसांतर्फे अंमली पदार्थ विक्री करणारे, जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत. गुन्हेशाखा युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, त्यांनी दिनांक २८.०६.२०२६ चे २१.१० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे वाडी हद्दीत साहील कॉम्प्लेक्स, तवक्कल ले आऊट, काटोल बायपास रोड येथे सार्वजनिक ठिकाणी रेड कारवाई केली असता, तेथे एका काळया रंगाचे मोपेडचे फुटरेस्टखाली दोन झिपलॉक पन्नीमध्ये अंमली पदार्थ एमडी पावडर वजनी ८.९ ग्राम मिळून आली. गाडी मालक महिलेस विचारपुस केली असता, तिने अंमली पदार्थ हा तिचा नसुन, कोणीतरी तिचे वाहनाचे फुटरेस्टखाली ठेवलेबाबत व सीसीटिव्ही फुटेजची पाहणी करावी असा आक्षेप घेतला. महिलेचे आक्षेपावरुन परिसरातील सीसीटिव्ही फुटेजची पाहणी केली असता, नमुद घटनेबाबत माहिती देणार इसम आरोपी नामे गोपाल किसन झोडगे वय ३७ वर्ष रा. परिश्रम कॉलनी, नरसाळा रोड, म्हाळगी नगर, नागपूर यानेच नमुद अंमली पदार्थ एमडी पावडर ही महिलेच्या मोपेडचे फुटरेस्टखाली ठेवल्याचे दिसून आले. आरोपीस ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने महिलेसोबत असलेल्या वैयक्ति वादाचे कारणावरुन तिला खोटया गुन्हयात अडकविण्याचे उद्येशाने पोलीसांना खोटी माहिती दिल्याचे कबुल केले. खबरी आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०१ मोबाईल फोन, व मोपेड गाडी असा एकुण ८५,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा स्वत:चे वैयक्तिक फायद्याकरीता त्याचे परिचीत महिलेस खोट्या गुन्ह्यात अडकविण्याचे उद्देशाने एम.डी. पावडर बाळगून महिलेच्या मोपेडचे फुटरेस्टखाली ठेवतांना सीसीटिव्ही फुटेजमध्ये दिसून आला.

आरोपींचे कृत्य हे कलम २३१,२३३,२४१ भा.न्या.सं. सहकलम ८(क),२२(ब) एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे वाडी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव वाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे सहा. पोलीस आयुक्त (अति. कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शानाखाली, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, सपोनि सचिन मत्ते, पोउपनि. मनोज राऊत व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**३) गुन्हेशाखा युनिट क्र. ०३ पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक २६.०६.२०२६ चे २२.३० वा. ते २३.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी नितीन दामोदर मेश्राम वय ३९ वर्षे रा. गरोबा मैदान, हनुमान मंदीर चौक, छापरु नगर, लकडगंज, नागपूर यांनी त्यांची ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ४९ बीएन ४७३५ किंमती २५,०००/—रू. ची पोलीस ठाणे तहसील हद्दीत हंसापुरी खदान येथील केजीएन हॉटेलसमोरील सार्वजनिक रस्त्यावर लॉक करुन, पार्क करून बिर्याणी सेंटर येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसील येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ०३ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपी नामे गुंजन उर्फ चिंटू विश्वजीत खोमने वय २८ वर्षे, रा. गांजाखेत, ज्योतीनगर खदान, तहसील, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस गुन्हयात अटक करून, त्याचे ताब्यातुन चोरी केलेले ०१ ॲक्टिवा वाहन कि. २५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्‌देमालासह पुढील कारवाईकामी तहसील पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अति. कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनात पोनि. अतुल मोहनकर व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**४) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास घातक शस्त्रासह अटक.**

दिनांक २९.०६.२०२६ चे ००.३० वा. ते ०१.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे कोतवाली हद्‌दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की,

अंगात काळया रंगाचा टिशर्ट व काळा जिन्सपॅन्ट घातलेला वय अंदाजे २५ वर्ष वयाचा हद्दपार इसम जुना भंडारा रोडवर फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी जाऊन, परिसरात शोध घेतला असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम पायदळ जातांना दिसुन आला. त्यास थांबवून त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अक्षय उर्फ बल्ली संजय समुद्रे वय २७ वर्षे रा. प्लॉट क्र. २६८, दुर्गा माता मंदीर गार्डनजवळ, गणेशनगर, भगत कॉलनी, कोतवाली नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत एक लोखंडी चाकु किंमती ३००/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र. ०३ यांचे हद्दपार आदेश क्र. १३/२०२६, दिनांक २७.०३.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कोतवाली येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का., सहकलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अति. कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनात पोनि. अतुल मोहनकर, पोउपनि. अमित देशमुख, पोहवा. अनुप तायवाडे, पोअं. मनिष रामटेके, विवेक भोयर व चापोअं विशाल रोकडे यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे अजनी :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २९.०६.२०२६ चे ०५.३० वा. चे सुमारास, अजनी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना वसंत नगर, राममंदीर जवळुन एक इसम दुचाकीवर संशयीतरित्या जातांना दिसून आला. त्यास थांबवून त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव रौनक रवि लोखंडे वय २० वर्षे रा. सावित्रीबाई फुले नगर, गली क्र. ३, शेवळे यांचे घरी किरायाने, अजनी, नागपुर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याचे वाहनाची व अंगझडती घेतली असता, त्याचे वाहनाचे डिक्कीत एक लोखंडी तलवार किंमती ३००/— रू. ची मिळुन आली. आरोपीचे ताब्यातून एल लोखंडी तलवार, ०१ मोबाईल फोन, काळया रंगाची हिरो स्प्लेंडर प्लस मोटार सायकल क्र. एमएच ४९ सीयू ७४४८ असा एकूण कि. ७७,३००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी सरतर्फे नरेश श्रावणकर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे अजनी येथे सपोनि कैलास आलुरे यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सोनेगाव :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २८.०६.२०२६ चे १८.३५ वा. चे सुमारास, सोनेगाव पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, पन्नासे ले आऊट परिसरात एक इसम तलवार बाळगून फिरत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन परिसरात शोध घेतला असता, प्राप्त वर्णनाचा इसम दिसून आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहून पळू लागला. त्याचा पाठलाग करुन, त्यास ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव शुभम उर्फ तिर्री प्रकाश कंगाले वय २६ वर्षे रा. प्लॉट क्र. १४, सावित्रीबाई फुले पुतळ्याजवळ, पन्नासे ले आऊट, सोनेगाव, नागपुर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक लोखंडी तलवार किंमती ४००/— रू. ची मिळुन आल्याने जप्त करण्यात आली.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी सरतर्फे पोहवा दिनेश खेडकर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे सोनेगाव येथे पोउपनि. प्रमोद मोहीते यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे पारडी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २८.०६.२०२६ चे १०.४० वा. ते ११.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे पारडी हद्दीत प्लॉट क्र. ५८, गली क्र. २, नवीन नगर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी विवेक गुलाबचंद गुप्ता वय २७ वर्ष हे आणि त्यांची मैत्रिण नामे इंद्रायणी वैरागडे वय २५ वर्ष हिचेसह आपले मोटार सायकल क्र. एम.एच ४९ एयु ९१८८ ने पोलीस पारडी हद्यीतील भंडारा रोडवरील सुरुची कंपनी समोरुन जात असतांना, त्यांचे पाठीमागून येणाऱ्या एका सिमेंट मिक्सर ट्रकचे चालकाने फिर्यादीचे मोटार सायकलला ओव्हरटेक करतांना, त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मोटरसायकलला उजवे साईडने धडक देऊन घटनास्थळावरून पळून गेला. अपघातामध्ये फिर्यादी व त्यांची मैत्रिण वाहनासह खाली पडून गंभीर जखमी झाले. लोकांनी जखमी यांना उपचाराकरीता भवानी हॉस्पिटल येथे दाखल केले. उपचारादरम्यान डॉक्टरांनी फिर्यादीची मैत्रिण इंद्रायणी देवेंद्र वैरागडे वय २५ वर्ष रा. जुनी मंगळवारी, सुर्यकांत सावजी भोजनालयचे मागे, नागपूर हिला तपासुन मृत घोषीत केले. फिर्यादीचा उपचार सुरु आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे मपोउपनि. राजकिरण ढोके ९४२१५६०५६२ यांनी सिमेट मिक्सर ट्रक चालकाविरूध्द कलम २८१,१०६(१),१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १३४,१७७,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे बेलतरोडी :—** कु. रिया विजय रत्ने वय १८ वर्षे रा. फ्लॅट क्र० ई—३, प्रितम अपार्टमेंट, चिचभवन, संजना गॅस एजन्सीजवळ, बेलतरोडी, नागपूर ही दिनांक २६.०६.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतील तीचे नातेवाईकाचे घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग—निमगोरा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची— ५ फुट २ इंच, केस—काळे लांब, अंगात—क्रिम रंगाचा प्रिंटेड सलवार सुट घातलेला तसेच, पायात गुलाबी रंगाची सॅन्डल घातलेली आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते. ओळख— डावे डोळ्याचे बाजुला मस्सा आहे.



कु. रिया

स्वा/–

( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.